



जालना : मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालय आणि 'सकाळ'तर्फे शनिवारी प्रवेशासंदर्भात झालेल्या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी. (दुसऱ्या छायाचित्रात) मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सी. एम. सेदानी.

# संधी खुणावताहेत, सोने करा!

## प्राचार्य सेदानींचा विद्यार्थी, पालकांना सल्ला : 'मत्स्योदरी', 'सकाळ'तर्फे कार्यशाळा

**जालना, ता. २० (बातमीदार) :** बारावी (विज्ञान) उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह तंत्रनिकेतनचा (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग; तसेच इतर व्यावसायिक, व्यवस्थापनशास्त्र या विषयांत अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याचा लाभ घेतल्यास विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल, असे मत मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम. सेदानी यांनी व्यक्त केले.

मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालय आणि 'सकाळ' माध्यम समूहातर्फे शनिवारी (ता.२०) बारावी विज्ञान; तसेच पॉलिटेक्निक उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पुढील दिशा स्पष्ट व्हावी, या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात कार्यशाळा झाली. मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालयातच वेगवेगळ्या अभ्यासक्रमांद्वारे कशा संधी उपलब्ध आहेत या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. त्या वेळी प्राचार्य सेदानी बोलत होते.

ते म्हणाले, की दहावी, बारावीची परीक्षा ही पुढील शैक्षणिक जीवनाला वळण देणारी असते. या परीक्षांत उत्तीर्ण झाल्यानंतर कोणती विद्याशाखा निवडावी, काय करावे, असा प्रश्न प्रश्न अनेक विद्यार्थी व त्यांच्या पालकांना पडतो. अशा वेळी पालकांनी गोंधळून न जाता विद्यार्थ्यांचा कल कशात आहे, हे पहिल्यांदा जाणून घ्यावे. त्यानंतर भविष्यात कुठे संधी आहेत, हे समजून घ्यावे. यासाठी अशा कार्यशाळेतून हमखास मार्ग सापडू शकतो. आजचे युग हे स्पर्धेचे आहे. त्यामुळे तंत्रकौशल्यासोबतच व्यवस्थापनशास्त्राचा अभ्यास गरजेचा झाला आहे. माजी खासदार आणि या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अंकुशराव टोपे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी या दोन्हींचे चांगले समीकरण मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालयात साधले आहे. केवळ मुंबई, पुण्यातच दर्जेदार शिक्षण मिळते, हा समज दूर करण्यासाठी त्यांनी जालन्यात १० वर्षांपूर्वीच काळाची पावले ओळखून मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयात बारावी (विज्ञान) उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी खुणावत असल्याचे प्राचार्य सेदानी म्हणाले. मत्स्योदरी इंजिनिअरिंग महाविद्यालयातील मेकॅनिकल, सिव्हील, टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर या क्षेत्रांत पदवी, या महाविद्यालयास नव्यानेच आलेला पदव्युत्तर पदवी (एमई) अभ्यासक्रम, एमबीए आदींसंदर्भात त्या-त्या अभ्यासक्रमांच्या प्रमुखांनी मार्गदर्शन केले. अभ्यासक्रम कसा, त्याची वैशिष्ट्ये, रोजगाराच्या नेमक्या संधी, त्यासाठी महाविद्यालयातर्फे प्लेसमेंटसाठी होणारी मदत याबद्दल माहिती दिली. आतापर्यंत केवळ शैक्षणिक उपक्रम राबविण्यासोबतच 'ग्रीन एनर्जी' या विषयावर विशेष कार्यशाळा, अंतर्गत सुरक्षा व्यवस्था, पर्यावरण जागृती या संदर्भातही विविध उपक्रम राबविल्याचे प्राध्यापकांनी सांगितले.

डॉ. एस. एस. पाटील आणि प्रा. डॉ. खेडेकर, प्रा. कुरेशी, प्रा. आर. एल. करवंदे यांनी त्यांच्या विभागाची 'स्लाइड शो'च्या माध्यमातून माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. शिवाजी परिहार, प्रा. के. एस. रेड्डी यांनी काम पाहिले. श्रीमती डॉ. एस. एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती प्रा. के. पी. शाह यांनी आभार मानले. प्रा. सोळंके, प्रा. देशमुख, प्रा. करकरे, प्रा. कळकुंबे, प्रा. चाकोते यांनी कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभाग घेतला.